पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक :नस/९/कावि/ १४६८ /०९
दिनांक : २४ /१२/२००९

प्रति,

मा.................................
सदस्य, विधी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

विषय : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक १/१/२०१० रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक १/१/२०१० रोजी दुपारी २:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : १) सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

मा. विधी समिती

<u>कार्यपत्रिका क्रमांक : १३</u>

दिनांक : १/१/२०१० वेळ : दुपारी २ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दिनांक १/१/२०१० रोजी दुपारी २ :०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

विषय क्रमांक :- १) विजयनगर काळेवाडीमध्ये बंद पाईप गटर्स करणे व इंटरलॉकींग पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी र.रु. १९,७९,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- २) भोसरी स.नं.९८/२ गुरुविहार कॉलनीमधील मोकळया जागेभोवती सिमाभिंत, ज्येष्ठ नागरीकांसाठी शेड व धबधबा करणेकामी र.रु.१७,९०,२००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ३) ताथवडे या गावाच्या अतिरिक्त क्षेत्रासाठी विकास योजना तयार करणेकामी सर्वेक्षणाचे (ELU) कामासाठी तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार अंदाजीत र.रु.४३,९४,०००/- खर्च अपेक्षित असल्याने निविदा काढुन सर्वेक्षणाचे कामास व खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ४) म.प्रा.व नि.न.अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) (ए ए) अन्वये शासनाने प्रसिध्द केलेल्या सुचनेनुसारचा मंजुर विकास नियंत्रण नियमावली मधील नियम क्र.१४ वाहनतळाबाबतच्या नियमातील टेबल क्र.६ मधील फेरबदलाच्या प्रस्तावाकामी शासनाने केलेले फेरबदल व मनपाचे समन्वय समितीने सुचविलेले फेरबदल याचा तुलनात्मक विचार करता मनपाचे समन्वय समितीने सुचविलेले फेरबदल अधिक उचित वाटत असल्यामुळे शासनाने केलेल्या फेरबदलाच्या अनुषंगाने फेरबदल न करता मनपाचे समन्वय समितीने सुचविलेल्या फेरबदलचा कलम ३७ च्या ठरावास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ५) थेरगाव वॉर्ड क्र.८६ मध्ये ठिकठिकाणी इंटरलॉकींग ब्लॉक बसविणेकामी र.रु.१२,५५,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ६) थेरगाव वॉर्ड क्र.८६ मध्ये डांबरीकरण करणेकामी र.रु.१४,६७,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ७) निवड यादीतील श्री.मुल्ला अकबर महंमद यांस मुख्याध्यापक पदावर पदोन्नतीने नेमणुक देणेस तसेच सन २०१० मध्ये मुख्याध्यापक रिक्त होणा-या पदावर प्रतिक्षा यादीतील श्री वारवारे श्रीपती हरी यांस आवश्यकतेनुसार पदोन्नतीने नियुक्ती देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/९/कावि/ १४६८/०९
दिनांक : २४/१२/२००९ चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.